नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/05/2023 (शुक्रवार) सकाळ

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीणची धडक कारवाई
## वाहनासह एकुण १९८६०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त

मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांचे आदेशान्वये अवैध धंदयाची वाहतुक करणारे वाहनांवर कार्यवाही करणेबाबत जिल्हा वाहतुक शाखेचे पथक हे कन्हान उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना भंडारा नागपूर रोडनी दिनांक ०५/०५/२०२३ चे सकाळी ०५.०० वा. दरम्यान जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन कत्तलीकरीता वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन जिल्हा वाहतुक शाखेच्या पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन पांढऱ्या रंगाची महींद्रा बोलेरो पिकअप क्र. एम. एच—३६/एए—३२४९ क्रमांकाच्या वाहनाला थांबवुन तपासले असता सदर वाहनात **आरोपी क्र. १) रोहीत रमेश गभणे, वय २३ वर्ष व त्याचा साथीदार नामे २) श्रीकांत तुळशीराम नगरकर, वय २५ वर्ष, दोन्ही रा. लाखनी जिल्हा भंडारा** यांच्या ताब्यातुन १३ नग बैल (गोवंश) जनावरे किमती अंदाजे १,२२,०००/—रू. तसेच पांढऱ्या रंगाची बोलेरो पिकअप क्र. एम. एच—३३/ जि.—१०२० या क्रमांकाच्या देखील वाहनाला थांबवुन तपासले असता सदर वाहनात **आरोपी क्र. १) अनिल अरूण ठवकर, वय २७ वर्ष, २) निलेश उर्फ आकाश हरीश हुमणे, वय २७ वर्ष, दोन्ही रा. नांदोरा जिल्हा भंडारा** यांच्या ताब्यातुन ०८ बैल (गोवंश) जनावरे किमती अंदाजे ६४,०००/—रू. असे एकुण २१ बैल (गोवंश) जनावरे एकुण किमती अंदाजे १८६०००/—रू जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांकडुन वाहनासह असा एकुण किंमती १९८६०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे फिर्यादी नामे— सहायक पोलीस निरीक्षक रविंद्र मस्कर, जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११ (१) (ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा १९६०, सहकलम ५(१)(२, ९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम १९९५, सहकलम ११९ महा. पोलीस अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील सर्व आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन मौदा करीत आहे.

सदरची कारवाई ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक श्री. विजय माहुलकर, सहायक पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र मस्कर, सहायक फौजदार सुधीर यादव, पोलीस नायक प्रणय बनाफर, पोलीस शिपाई कार्तिक पुरी जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर